# राष्ट्रीय सेवा योजना विविध: कार्यक्रमांची क्षणचित्रे



रा.से.यो.स्थापना दिनी मार्गदर्शन करताना डॉ.माधव कदम



रा.से.यो.स्थापना दिनी मार्गदर्शन करताना डॉ.एन.एन.गजरे



नगराध्यक्षा श्रीमती हेमलता पाटील स्वयंसेवकाना मार्गदर्शन करताना



तहसीलदार श्रीमती सुनिता जऱ्हाड स्वयंसेवकाना मार्गदर्शन करताना



पूरग्रस्तांसाठी रु.२१०००/-चा चेक नागराध्याक्षाना देताना




स्वच्छ भारत अभियान रॅली



संस्थे तर्फे सत्कार स्वीकारताना




छात्र संसद, नवी दिल्ली येथे बोलताना उमेश कोकणी



वनराई बंधारा क्र. १



वनराई बंधारा क्र. २



वनराई बंधारा क्र. ३



वनराई बंधारा क्र. ४





वनराई बंधारा क्र. ५

वनराई बंधारा क्र. ६





वनराई बंधारा क्र. ७

वनराई बंधारा क्र. ८



वनराई बंधारा क्र. ९



वनराई बंधार्यांमुळे विहिरींच्या जलपातळीत

झालेल्या वाढीची पाहणी करताना

मा.जिल्हाधिकारी



जिल्हाधिकारी श्री.कलशेट्टी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना




स्वचता ऐप बद्दल माहिती देताना



जिल्हा समन्वयक डॉ.माधव कदम विशेष हिवाळी शिबिरात हितगुज करताना



ओझोन डे वर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.एन.एन.गजरे



वृक्षा रोपण करताना मा.शिरीषकुमार नाईक




उत्कृष्ट संघ नायकाचा पुरस्कार मा.कुलगुरू डॉ.पी.पी.पाटील यांच्या हस्ते

स्वीकारताना




स्वयंसेवक वृक्षा रोपण करताना



मा. आमदार श्री.सुरुप्सिंग्जी नाईक
वृक्षा रोपण करताना



जि,प.अध्यक्षा सौ.रजनीताई नाईक
वृक्षा रोपण करताना



गटविकास अधिकारी श्री.नंदकुमार वाळेकर
वृक्षा रोपण करताना



शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी
वृक्षा रोपण करताना



योगसाधना व ध्यानधारणा प्रशिक्षण




योगसाधना व ध्यानधारणा प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करताना श्री. पारेख (वर्धा) प्रा.आर.आर.पाठक



योगसाधना व ध्यानधारणा प्रशिक्षण शिबिरात योगाभ्यास शिकवताना



योगसाधना व ध्यानधारणा प्रशिक्षण शिबिरात योगाभ्यास शिकताना विद्यार्थी



पथसंचलन शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना मेजोर एखंडे



२६ जानेवारी पथसंचलन शिबिर



हुंडाबळी व व्यसनमुक्ती वर पथनाट्य



क्रांती दिन



महात्मा गांधी जयंती निमित्त रॅली



निर्माल्य संकलन मोहीम



स्वच्छ भारत अभियान




उत्कृष्ठ एककाचा पुरस्कार मा.कुलगुरूंच्या हस्ते स्वीकारताना




उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकार्याच्या पुरस्कार मा.दिलीपदादा पाटील यांच्या हस्ते

स्वीकारताना




उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार मा.कुलगुरूंच्या हस्ते स्वीकारताना

# वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे

दैनिक दिव्य मराठी
01-Sep-2018
धुळे सिटी Page 3

आरोग्य | योगगुरू प्रतीक पारेख यांचा सल्ला; नवापूरमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात कार्यशाळा

## तणावमुक्त जीवनासह एकाग्रतेसाठी योगा करा

प्रतिनिधी | नवापूर

योगासन केल्यामुळे कार्यक्षमता वाढते. त्याचबरोबर अभ्यासावर लक्ष केंद्रित होते. तणावमुक्त जीवन जगण्यासह एकाग्रता वाढविण्यासाठी योगासन व ध्यानधारणा करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जालना येथील प्रतीक पारेख यांनी केले.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे योग व ध्यानधारणा या विषयावर कार्यशाळा झाली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे, अनिल शर्मा, मंजुळा अग्रवाल, श्रुती अग्रवाल, अक्षित अग्रवाल, कार्यक्रम अधिकारी डॉ. नामदेव गजरे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. मंदा गावित आदी उपस्थित होते. प्रतीक शर्मा म्हणाले की, तरुणांनी रोज योगासने केली पाहिजे. योगासने केल्यामुळे तणाव कमी होतो. स्मरणशक्तीत वाढ करण्यासाठी ध्यान करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नामदेव गजरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आनंदसिंग पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य प्रा. ए. बी. महाजन व प्रा. गौरव बोरदे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नामदेव गजरे, प्रा. आनंदसिंग पाटील, प्रा. गौरव बोरदे, प्रा. सुदाम कोरडे, हिरालाल वसावे, प्रकाश पिंपळे, राजू जाधव, इंद्रजीत गावित, रमेश चव्हाण, विजय कुलकर्णी यांनी प्रयत्न केले.



नवापूर येथे झालेल्या कार्यशाळेला उपस्थित विद्यार्थी.

### योगासनांची प्रात्यक्षिके

या वेळी प्रतीक पारेख यांनी योगासनाची विविध प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून घेतली. अनिल शर्मा यांनीही योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. प्रत्येकाने रोज सकाळी किमान अर्धा तास योगसाधनेसाठी द्यावा, तसे केल्याने शरीर सुदृढ राहण्यास मदत होईल, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

## रासयोतर्फे योग व ध्यान धारणा कार्यशाळा

**योगगुरू प्रतीक पारेख यांचे योगधडे**



। नवापूर ✍ प्रतिनिधी ।

**कला** वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या दोनी राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे 'योग व ध्यानधारणा ' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी योग गुरु मा श्री प्रतीक पारेख , जालना हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात तरुण पिढीला योगाचे महत्व पटविले.

### विविध मान्यवरांची उपस्थिती

**या** कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा ए बी महाजन होते , त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात तरुण पिढीने दररोज योग व ध्यानधारणा केल्यास यश मिळाल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा वाय जी भदाणे , मा श्री अनिल शर्मा , श्रीमती मंजुळाबेन अग्रवाल, श्रीमती श्रुती अग्रवाल , अक्षित अग्रवाल कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे, जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी श्रीमती प्रा मंदा गावीत यांची उपस्थिती होती. याशिवाय श्री अनिल शर्मा यांनीही प्रात्यक्षिके करून दाखविली . या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे , प्रा आनंदसिंग पाटील , प्रा गौरव बोरदे , प्रा सुदाम कोरडे , शिक्षकेत्तर कर्मचारी श्री हिरालाल वसावे , प्रकाश पिंपळे , राजू जाधव , इंद्रजित गावीत , रमेश चव्हाण , विजय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले . सादर कार्यशाळेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी व खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा आनंदसिंग पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा गौरव बोरदे यांनी केले.



जळगाव : नागपूर येथे झालेल्या उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेतील पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू प्रा. पी. पी. पाटील, प्र- कुलगुरू प्रा. पी. पी. माहुलीकर, दिलीप पाटील, कुलसचिव बी. बी. पाटील, प्रा. सत्यजित साळवे.

## राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत विद्यापीठास चार बक्षिसे

जळगाव, ता. ३१ : नागपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय उत्कर्ष या सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने चार पारितोषिके पटकावली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २७ते ३० जानेवारी दरम्यान उत्कर्ष स्पर्धा झाली. या स्पर्धेत माधुरी पाटील (बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव) या विद्यार्थिनीला निबंध स्पर्धेत प्रथम, धर्मेश हिरे (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे) याला वक्तृत्व स्पर्धेत तृतीय, तसेच अविनाश पाटील (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) याला काव्यवाचनात तृतीय आणि बिजल राणा (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर) या विद्यार्थिनीला चित्रकला स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ही चार पारितोषिके प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरू प्रा. पी. पी. पाटील यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. पी. पी. माहुलीकर, कुलसचिव भ. भा. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा. एस. टी. इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक बी. पी. पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी एस. आर. गोहिल, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. सत्यजित साळवे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यापीठाच्या या संघात १९ जण सहभागी झाले होते. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. नामदेव गजरे (नवापूर) यांनी काम पाहिले. संघात जयेश साळुंखे, राजू तडवी, आकाश धनगर, भूषण भदाणे, रोहित पवार, आशिष पाडवी, कृष्णा कोकणी, ऐश्वर्या झोपे, पूनम पवार, तेजस्विनी तायडे, हेमलता जिरे, गुंटूर कुजानकीकाव्या, नीता पावरा, सोनाली कोकणी या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

दैनिक दिव्य मराठी
05-Jul-2018
धुळे सिटी Page 3

## नवापूर वनक्षेत्रात साडेतीन लाख वृक्षांचे रोपण करण्याचा संकल्प

प्रतिनिधी | नवापूर

वृक्षारोपण मोहिमेतंर्गत नवापूर वनक्षेत्रात साडेतीन लाख रोपांचे रोपण होणार आहे. तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला वन विभागातर्फे एक हजार ११ रोपे देणार आहे.

वृक्षारोपण मोहिमेचे येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उद्घाटन झाले. या वेळी माजी मंत्री तथा आमदार सुरूपसिंग नाईक, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा रजनी नाईक, गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर, वनक्षेत्रपाल प्रथमेश हाडपे, गटशिक्षणाधिकारी आर.बी. चौरे, प्राचार्य डॉ. ए.जी. जयस्वाल, डॉ. नचिकेत नाईक, रोशन नाईक, आसिफ मलिक, केंद्रप्रमुख केशव सांगळे उपस्थित होते.

या वेळी आमदार सुरूपसिंग नाईक म्हणाले की, राज्यात १३ कोटी वृक्षांचे रोपण होणार आहे. हा शासनाचा महत्त्वाचा उपक्रम आहे. तालुक्यातील सर्व विभागांनी हा उपक्रम यशस्वी करावा. वन विभागाच्या रोपवाटिकेतून रोपे घेऊन ती शासकीय जागेवर व रस्त्याच्या दुतर्फा लावावी, असेही ते म्हणाले. वनक्षेत्रपाल प्रथमेश हाडपे म्हणाले की, नवापूर वनक्षेत्रातील प्रतापपूर, भवरे, खेकडा, चिंचमांजरे, उकाळापाणी, वारी परिसरात तीन लाख ५० हजार रोपे लावण्यात येणार आहेत. वृक्षारोपणाचे काम वेगात सुरू झाले आहे. प्रत्येक नागरिकाने कर्तव्य समजून या मोहिमेत सहभागी व्हावे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वनपाल एस.एल. कासार, डी.के. जाधव, पी.बी. मावची, वनरक्षक चित्ते, पावरा, थोरात, मेघा बोरसे, खैरनार यांनी प्रयत्न केले.



वृक्षारोपण करताना आमदार सुरूपसिंग नाईक यांच्यासह मान्यवर.

# नवापुर महाविद्यालयात वनविभागामार्फत वृक्षलागवड

## मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

।नवापूर ✍ प्रतिनिधी।

शहरातील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे वनविभागा मार्फत १३ कोटी वृक्षलागवड २०१८ या अंतर्गत कार्याक्रमाचा शुभारंभ माजी मंत्री तथा आ. सुरुपसिंग नाईक व जि.प अध्यक्ष रजनी नाईक यांचा हस्ते कॉलेजचा परिसरात वृक्षारोपन करुन करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर, वनक्षेत्रपाल प्रथमेश हाडपे, गटशिक्षण अधिकारी आर. बी. चौरे, प्राचार्य डॉ. ए जी जयस्वाल,डॉ नचिकेत नाईक, रोशन नाईक,आसिफ मलीक, केद्र प्रमुख केशव सांगळे, व वनकर्मचारी उपस्थित होते.



### घरचे कर्तव्य समजून सहभागी व्हा..

तालुक्यातील प्रत्येक यंत्रणेने वनविभागाचा रोप वाटीकेतुन रोपे घेऊन शासकीय जागेवर व रस्ता दुतर्फ जागेवर वृक्षलागवड करावी, असे आवाहन आ.सुरुपसिंग नाईक यांनी केले. तसेच वनक्षेत्रपाल प्रथमेश हाडपे यांनी नवापूर वनक्षेत्रात मौजे प्रतापपुर,भवरे,खेकडा,बिलमांजरे,उकाळापाणी,बारी,येथे आज पासुन ३लाख ५० हजार वृक्षलागवड चे काम आज पासुन युध्दपातळीवर काम सुरु झाले असल्याचे सांगितले. हे काम १३ कोटी

# ओझोन वायूचे संरक्षण करणे काळाची गरज

## ओझोन दिनी डॉ नामदेव गजरे यांचे प्रतिपादन



।नवापूर ✍ प्रतिनिधी।

**ओझोन** वायूचे वातावरणातील स्थान स्थितांबरामध्ये असून हा वायू २५ ते ४० किलोमीटर उंचीच्या दरम्यान असणारा हा वायू सजीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा असून या वायुचे संरक्षण काळाची गरज असल्याचे मत डॉ नामदेव गजरे यांनी सांगितले. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील उमवि व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही रासेयो एककातर्फे ' निसर्गाच्या सानिध्यात वृक्षलागवडीने ओझोनदिन झाला.

### ..तर जीवसृष्टी काही सेकंदात जळाली असती

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे, प्रमुख पाहुणे म्हणूनप्रा आनंदसिंग पाटील होते. सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांचे शोषण ओझोन थरात केले जाते. कदाचित वातावरणात हा थर नसता तर ही प्रखर उष्णतेची किरणे सरळ पृथ्वीवर आली असती आणि त्या किरणांमुळे सजीव सृष्टी काही सेकंदाच्या आत जळून खाक झाली असती, म्हणून ओझोन थराला 'पृथ्वीची संरक्षक छत्री' असे म्हणतात. परंतु दिवसेंदिवस कारखान्यामुळे व घरात वापरल्या जाणाऱ्या फ्रीजमुळे खूप मोठ्या ओझोन थराला छिद्र पडत असल्याचे डॉ. गजरे यांनी सांगितले. यासाठी प्रत्येकाने आपली सुंदर पृथ्वी वाचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी कमीत कमी वाहनाचा वापर, औद्योगिक क्षेत्रात वृक्षलागवड करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यासाठी आपण प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात जनजागृती करावे असे आवाहन त्यांनी केले.प्रा आनंदसिंग पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रा पंजाबसिंग वळवी, हर्षल गावीत, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा आनंदसिंग पाटील, प्रा पंजाबसिंग वळवी, हर्षल गावीत यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा पंजाबसिंग वळवी यांनी केले तर आभार हर्षल गावीत यांनी मानले.

यांनी दिली.

# ओझोन वायूचा थर ही पृथ्वीची संरक्षक छत्री : डॉ. गजरे

प्रतिनिधी | नवापूर

सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांचे शोषण ओझोन वायूच्या थरामुळे होते. या वायूचा थर पृथ्वीच्या अवतीभवती नसता तर ही सूर्याची प्रखर किरणे सरळ पृथ्वीवर आली असती. या किरणांमुळे सृष्टी काही सेकंदांच्या आत जळून खाक झाली असती. त्यामुळे ओझोन वायूच्या थराला 'पृथ्वीची संरक्षक छत्री' असे म्हटले जाते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. नामदेव गजरे यांनी केले.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे ओझोन दिनानिमित्त कार्यक्रम झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे अध्यक्षस्थानी होते. प्रा. आनंदसिंग पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

डॉ. नामदेव गजरे म्हणाले की, ओझोन वायूचे वातावरणातील स्थान महत्त्वाचे आहे; परंतु दिवसेंदिवस वाढत असलेल्या प्रदूषणामुळे ओझोन वायूच्या थराला छिद्र पडते आहे. त्यामुळे प्रत्येकाने प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. प्रदूषण कमी केले तरच पृथ्वी वाचेल. औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात वृक्षारोपणावर भर देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. प्रा. आनंदसिंग पाटील यांनी ओझोन वायूची निर्मिती कशी होते, शिवाय हा वायू किती महत्त्वाचा याची माहिती दिली. उपप्राचार्य वाय. जी. भदाणे म्हणाले की, ओझोन वायूच्या क्षयामुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहे. प्रत्येकाने वृक्षारोपणवर भर देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाला प्रा. पंजाबसिंग वळवी, हर्षल गावित आदींसह मान्यवर उपस्थित होते. प्रा. पंजाबसिंग वळवी यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# कोठड्यात स्वच्छता मिशन प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवापूर :** शहरातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे मौजे कोठडा येथे स्वच्छ भारत अभियान १०० तास स्वच्छता प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ.ए.जी जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली तर सरपंच विरसिंग कोकणी, उपप्राचार्य ए.बी. महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. व्यासपीठावर कार्यक्रम अधिकारी डॉ.नामदेव गजरे, मुख्याध्यापिका वळवी, उपशिक्षिका जागृती पाटील, पचायत समिती सदस्य लाजरस गावीत उपस्थित होते.

१०० तासाच्या उपक्रमात कोठडा गावात स्वच्छतेबाबत जनजागृती व प्रबोधन शिबीर, स्वच्छता मेळावा, स्वच्छता गृहांचा वापर, विदयार्थी रॅली, वृक्षारोपण, घरांना भेटी, कचऱ्याची विल्हेवाट, कचऱ्याचे व्यवस्थापन, सेंद्रीय खत निर्मिती, पथनाट्य , बायोगॅस निर्मितीसाठी मार्गदर्शन, भित्तीपत्रके, रस्ते गटार स्वच्छता, कुजणाऱ्या व न कुजणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रा.ए.बी. महाजन यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक करून त्याचा आदर्श घेऊन गावकऱ्यांनो पुढे हा उपक्रम असाच चालू ठेवावा, असे आवाहन केले. सरपंच विरसिंग कोकणी यांनी विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना एक आदर्श घालून दिला. त्यामुळे यातून आम्हाला प्रेरणा मिळाली, यापुढे निश्चितच गावातील नागरिक पुढे येतील व स्वच्छता राखण्याचा प्रयत्न करतील, असे सांगितले. जिल्हा परिषद शिक्षका जागृती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी प्राचार्य डॉ.ए.जी. जयस्वाल यांनी या अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करून कौतुक केले.

कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.नामदेव गजरे, प्रा.गौरव बोरदे, प्रा.सुदाम कोरडे, प्रा.एकनाथ गेडाम, प्रा.विनायक वसईकर, प्रा.एस.बी. महाजन, प्रा.पंजाबसिंग वळवी, हर्षल गावीत यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा.डॉ.नामदेव गजरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.सुदाम कोरडे तर आभार प्रा.विनायक वसईकर यांनी मानले.

Hello Nandurbar
Page No. 3 Sep 23, 2018
Powered by: erelego.com






# रा.से.यो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.गजरेंचा सत्कार

## नवापूर येथे महाविद्यालयात आयोजन

। नवापूर प्रतिनिधी ।

येथे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष आरिफभाई पालावला, मानद सचिव तानाजीराव वळवी, सहसचिव अजय पाटील, संचालक काशीमभाई मुल्ला, संचालक जी.के. पठाण ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए. जी. जयस्वाल , उपप्राचार्य प्रा.ए बी महाजन व प्रा. वाय जी भदाने आदी उपस्थित होते.

### उपक्रमांमध्ये घेतला सहभाग



राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक प्रा. डॉ.नामदेव गजरे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबविलेले उपक्रमाबद्दल कौतुक केले. विशेष हिवाळी शिबिराच्या माध्यमातून मौजे गढद येथे दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेऊन १५ वनराई बंधारे बांधून जलसंधारणावर भरीव असे कार्य झाले त्या कामाची नोंद घेऊन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, तहसीलदार सुनीता जऱ्हाड, गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर यांनी कौतुक करून सत्कार केला होता. यासर्व कार्याची संस्थेने नोंद घेऊन त्याबद्दल संस्थेचे मानद सचिव तानाजीराव वळवी यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी कथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. नामदेव गजरे यांचा महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यात शाल, सन्मानचिन्ह व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

स्वच्छ भारत अभियान स्पर्धेमध्ये विद्यापीठात अनिल जहागू गावित याने पटकविले पारितोषिक

# नवापूर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार

उत्कृष्ट स्वयंसेवकांचा सन्मान ; अभियानात ४१ विद्यार्थ्यांचा सहभाग



### राज्यस्तरीय स्पर्धेत यश

### युवा संसद स्पर्धेत उमेश कोकणी प्रथम

# महात्मा गांधी यांच्या शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी जयंतीदिनी जीवनग्रंथ प्रदर्शन

## महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

। नवापूर प्रतिनिधी।

**राष्ट्रपिता** महात्मा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती उत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक कार्यक्रमात कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित साप्ताहिक व्याख्यानमालेत चौथे पुष्प ' गांधी विचार व आजचा युवक आणि महात्मा गांधीच्या जीवन ग्रंथाच्या पुस्तक प्रदर्शनाचे उदघाटन करून ' प्राचार्य डॉ ए जी जयस्वाल यांनी गुंफले.

### उमवि–यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे सहकार्य

**राष्ट्रीय** सेवा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे ' राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय यांच्या सयुंक्त विद्यमाने आयोजित महात्मा गांधी यांच्या जीवन ग्रंथाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हे दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार असून, महात्मा गांधीजीचे संघर्ष आणि विचार जाणून घेण्यासाठी या ग्रंथ प्रदर्शनाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए जी जयस्वाल यांनी केले, पुढे बोलताना ते असे म्हणाले की गांधींचे विचार आजच्या युवकांमध्ये रुजविणे अतिशय गरजेचे आहे यासाठी महात्मा गांधींच्या ग्रंथ वाचणे काळाची गरज आहे .या ग्रंथ प्रदर्शनाच्या उदघाटनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए जी जयस्वाल , उपप्राचार्य प्रा वाय जी भदाणे , कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे, ग्रंथपाल प्रा राहुल तुपे , प्रा डॉ आय जी पठाण , प्रा पंजाबसिंग वळवी होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी




कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे , व ग्रंथपाल प्रा राहुल तुपे , यांनी परिश्रम घेतले . सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक , पत्रकार, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी भेट दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा राहुल तुपे यांनी केले.

# उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव



विविध क्षेत्रात यश मिळवणारे नवापूर येथील गुणवंत विद्यार्थी.

प्रतिनिधी | नवापूर

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बक्षीस वितरण कार्यक्रम झाला. वर्षभरात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला संस्थेचे कोषाध्यक्ष आरिफ पालावला, मानद सचिव तानाजीराव वळवी, सहसचिव अजय पाटील, संचालक कासिम मुल्ला, संचालक जी. के. पठाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल, उपप्राचार्य प्रा. ए. बी. महाजन, प्रा. वाय. जी. भदाणे आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक प्रा. डॉ.नामदेव गजरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. गेल्या तीन वर्षांत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आले. स्वच्छ भारत अभियान स्पर्धेत अनिल जहागू गावित याने दहा हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. या अभियानात ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शाहरुख गावितने द्वितीय तर हर्षा हंसराज गावितने तृतीय क्रमांक मिळवला. हे अभियान नोडल अधिकारी डॉ. नामदेव गजरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले. नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत बीजल राणाने पोस्टर स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या जिल्हास्तरीय पथसंचलन शिबिरात अल्पेश गावित, मंगेश बेडसे, आकाश कोकणी, मीनाक्षी कोकणी, दीना गावित, महिमा मावची, रिकलेमा वळवी यांनी सहभाग नोंदवला. जिल्हास्तरीय युवा संसद स्पर्धेत उमेश कोकणीने प्रथम क्रमांक मिळवला. त्याने राज्यस्तरीय युवा संसद स्पर्धेत जिल्ह्याचे नेतृत्व केले. तसेच दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतही तो सहभागी झाला होता. कोल्हापूरला झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात अनिल जहागू गावितने बक्षीस मिळवले. या कामगिरीबद्दल सर्वांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून महेंद्र विनायक वळवी व अनिल जहागू गावित यांना तर स्वयंसेविका म्हणून कल्पना अरुण मावची यांना बक्षीस देण्यात आले. विशेष व हिवाळी शिबिरातील कामगिरीसाठी उत्कृष्ट ग्रुप म्हणून सातपुडा व अस्तंभा ग्रुपची निवड करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नामदेव गजरे यांचाही सत्कार करण्यात आला.

दि. २९ जुलै २०१८



# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

नवापूर (प्रतिनिधी):— कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे गुरुपौर्णिमा सादरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. आनंद पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. नामदेव गजरे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती देऊन महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.अशोक पाटील होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. आर.आर. पाठक होते व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. वाय.जी. भदाणे, डॉ. आर.डी. पाटील, डॉ. एस.डी. पाटील, प्रा. पी.बी. बागुल, डॉ. एस.बी. महाजन, प्रा. सौ. एस.एम. उदावंत, प्रा. एस.एस. काळे, प्रा. निखिल जोशी यांची उपस्थिती होती. प्रा. आर.आर. पाठक यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असतांना त्यांनी आपल्या व्याख्यानात गुरुचा महिमा अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. महर्षी व्यास, द्रोणाचार्य यांची माहिती दिली. याशिवाय डॉ. आर.डी. पाटील, डॉ. एस.डी. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. चंचल खैरनार या विद्यार्थिनीने आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना घडविण्यात गुरुंचे योगदान खूप महत्त्वाचे असते. आपण ते घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा. ए. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी गुरुकडून भरपूर ज्ञान घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून त्याची जोपासना करा व पर्यावरण वाचवा ही खरी आमची गुरुदक्षिणा असेल असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. आनंदसिंग पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नामदेव गजरे यांनी केले.

# नवापूर महाविद्यालयाच्या 'रासेयो'चे काम उल्लेखनीय

## जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी : गडद येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

नवापूर, ता. २८ : राज्यात महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना राबवीत असते; परंतु नवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या माध्यमातून केलेल्या कार्याचा तोड कुणालाही करता येणार नाही. एवढे भरीव कार्य या एककाने केलेले आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून नंदुरबार जिल्ह्यात एक हजार २५७ बंधारे बांधण्यात आले आहेत; परंतु त्यामध्ये क्रमांक एकचा वनराई बंधारा नवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी बांधल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी सांगितले.

येथील कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर गडद (ता. नवापूर) येथे १७ ते २३ डिसेंबर या दरम्यान झाले. या शिबिराच्या समारोपप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. कलशेट्टी बोलत होते. संस्थेचे मानद सचिव तानाजी वळवी अध्यक्षस्थानी होते. तहसीलदार सुनीता जऱ्हाड, गटविकास अधिकारी वाळेकर, सरपंच कुंदा वळवी, प्राचार्य डॉ. ए.जी. जयस्वाल संस्थेचे सहसचिव अजय पाटील, उपप्राचार्य प्रा. ए. बी. महाजन, प्रा. वाय. जी. भदाणे उपस्थित होते.

डॉ. गजरे म्हणाले, की श्रमदान, बौद्धिक सत्र आणि सांस्कृतिक सत्र अशा तीन सत्रांमध्ये हे शिबिर झाले. सात दिवसांत पाच वनराई बंधारे तीन हजार ५०० गोण्या वापरून बांधण्यात आले. या बंधाऱ्यांची लांबी जवळपास दीडशे फूट व रुंदी अडीच फूट आणि उंची सात फूट असे आहे. बौद्धिक सत्रात रक्तदान, अवयवदान, वन संवर्धन, डिजिटल साक्षरता, स्पर्धा परीक्षा, डिजिटल लायब्ररी, आपत्ती व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, बेटी बचाव, महिला मेळावा, मुलाखत तंत्र तसेच सोशल मीडियाचा विधायक कामासाठी वापर, अंधश्रद्धा निर्मूलन, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण ही वेगवेगळी उद्दिष्टे राबविण्यात आली.

शिबिरात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या एककाचे १२५ विद्यार्थी व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या एककाचे ५० विद्यार्थी असे १७५ विद्यार्थी सहभागी झाले होत. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंदसिंग पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुदाम कोरडे यांनी आभार मानले.



गडद (ता. नंदुरबार) : नवापूर महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिरात बोलताना जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी. शेजारी तानाजी वळवी, सुनीता जऱ्हाट, नंदकुमार वाळेकर, कुंदा वळवी, डॉ. ए. जी. जयस्वाल आदी

# 'स्वच्छतेसाठी शंभर तास प्रशिक्षण'चा समारोप

## नवापूर महाविद्यालय : कोठडा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

नवापूर, ता. ११ : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'स्वच्छ भारत अभियान शंभर तास उन्हाळी प्रशिक्षण स्वच्छतेसाठी' या उपक्रमाचा समारोप कोठडा (ता. नवापूर) येथे नुकताच झाला.

प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल अध्यक्षस्थानी होते. सरपंच वीरसिंग कोकणी, उपप्राचार्य ए. बी. महाजन उपस्थित होते. योजनेमार्फत कोठडा येथे स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी प्रबोधन शिबिर, स्वच्छता मेळा, स्वच्छता गृहांचा वापर, विद्यार्थी रॅली, वृक्षारोपण, प्रत्येक घरांना भेटी, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य मार्गदर्शन, कचऱ्याचे व्यवस्थापन, सेंद्रिय खतनिर्मिती, पथनाट्य, बायोगॅसनिर्मितीसाठी मार्गदर्शन, भित्तिपत्रके, रस्ते- गटार स्वच्छता याबद्दल मार्गदर्शन केले. कुजणाऱ्या व न कुजणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन आदी विषयांवर प्रशिक्षण झाले.

प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून गावातील ग्रामस्थांना मदतीला घेऊन जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. ए. बी. महाजन यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. याचा आदर्श घेऊन ग्रामस्थांनी पुढे हा उपक्रम असाच चालू ठेवावा, असे आवाहन केले. सरपंच विरसिंग कोकणी यांनी विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना एक आदर्श घालून दिला. त्यामुळे यातून आम्हाला प्रेरणा मिळाली. यापुढे निश्चितच गावातील नागरिक पुढे येतील यात शंका नाही. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका जागृती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य जयस्वाल यांनी या अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करून कौतुक केले. ते म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावागावात होणारी स्वच्छतेची कामे परिसराला आदर्श निर्माण करणारी ठरतील. त्या- त्या भागातील ग्रामस्थ त्याचा आदर्श घेऊन आपला परिसर स्वच्छ ठेवतील. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नोडल अधिकारी डॉ. नामदेव गजरे, प्रा. गौरव बोरदे, प्रा. सुदाम कोरडे, प्रा. एकनाथ गेडाम, प्रा. विनायक वसईकर, प्रा. एस. बी. महाजन, प्रा. पंजाबसिंग वळवी, हर्षल गावित, मीना शहा, कुशलता मावची यांनी परिश्रम घेतले. प्रा. सुदाम कोरडे यांनी सूत्रसंचालन केले. विनायक वसईकर यांनी आभार मानले.



नवापूर : राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वच्छ भारत अभियानांतर्गत शंभर तास उन्हाळी प्रशिक्षण स्वच्छता उपक्रमाच्या समारोपप्रसंगी बोलताना श्री. गजरे. शेजारी प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल, वीरसिंग कोकणी, ए. बी. महाजन.

# नवापूर महाविद्यालयात रासेयो दिवस साजरा

। नवापूर प्रतिनिधी।

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त



कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे राष्ट्रीय सेवा योजना हा दिवस 'स्वच्छता हि सेवा ' दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल तर प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे नंदुरबार जिल्हा समन्वयक प्रा डॉ माधव कदम होते. आज प्रत्येक नागरिक स्वयंसेवक होणे काळाची गरज आहे, यासाठी तुम्ही राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विदयार्थी समाज परिवर्तनासाठी पुढे यावे, असे आवाहन प्रा. कदम यांनी केले. नंतर विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे ' श्यामची आई ' तील एकपात्री प्रयोग करून दाखविले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ जयस्वाल यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरापासून स्वच्छतेतून समाजपरिवर्तनाची मोहीम हाती घ्यावी, तेंव्हा गाव, तालुका, जिल्हा बदलायला वेळ लागणार नाही. हे कार्य तुम्ही तातपरतेने हाती घ्याल, अशी अपेक्षा व्यक्त केली. महाविद्यालयातील रासेयो विभागाने केलेल्या कामगिरीचा आलेख सतत उंचावत असून तो असाच ठेवा जेणेकरून त्याचा लाभ समाजाला व पर्यायाने देशाला होईल. तसेच नवापुरच्या तहसीलदार सुनीता जऱ्हाड व हेमलता पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ नामदेव गजरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट करून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वर्षभरात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले , तसेच या दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक कार्यक्रमात कोणकोणते कार्यक्रम राबविले जाणार आहेत याची माहिती दिली.

# गांधीचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन स्वच्छतेचे कार्य करा : नगराध्यक्षा सौ हेमलता पाटील



नवापूर (प्रतिनिधी) - कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित साप्ताहिक व्याख्यानमालेत तिसरे पुष्प 'महात्मा गांधी च्या चळवळीत कस्तुरबांचे योगदा ' या विषयावर सौ हेमलता पाटील यांनी गुंफले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे ' राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमाच्या साप्ताहिक व्याख्यान मालेत सौ हेमलता पाटील बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा वाय जी भदाणे होते. प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना सौ हेमलता पाटील महात्मा गांधींच्या स्वप्नातील स्वच्छ व सुंदर भारत हि संकल्पना रासेयो च्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागापर्यंत घेऊन जातील अशी आशा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य प्रा वाय जी भदाणे यांनी असे म्हणाले की जसे महाविद्यालय स्वच्छ ठेवण्यामध्ये स्वयंसेवकांनी पुढाकार घेतलेला आहे तसेच कार्य तूम्ही प्रत्येक गावामध्ये करावे असे आवाहन केले .नंदुरबार व जळगाव जिल्ह्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ नामदेव गजरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून पुढील चार दिवसाच्या व्याख्यानमालेच्या विषयाची माहिती दिली, व्यासपीठावर नगराध्यक्षा सौ हेमलता पाटील , उपप्राचार्य प्रा वाय जी भदाणे , कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा आनंदसिंग पाटील होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे , सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा आनंदसिंग पाटील व प्रा राहुल तुपे , स्वयंसेवक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले . सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा आनंदसिंग पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा डॉ एस एस पुलावळे यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी | 29-Sep-2018 धुळे Page 4

# विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राविषयी जागृती-जाणीव निर्माण करणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश

**कदम यांचे प्रतिपादन, नवापूरला कार्यक्रम**

प्रतिनिधी | नवापूर



राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त नवापूर येथे झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवर.

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमासह सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे नंदुरबार जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. माधव कदम यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे 'स्वच्छता ही सेवा' दिन साजरा करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल अध्यक्षस्थानी होते. या वेळी तहसीलदार सुनीता जऱ्हाड, नगराध्यक्षा हेमलता पाटील, कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक डॉ. नामदेव गजरे, उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे, प्रा. ए. बी. महाजन, डॉ. दीपक जयस्वाल, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंदसिंग पाटील होते. प्रा. डॉ. माधव कदम म्हणाले की, युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयामार्फत २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी निर्माण होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी समाज परिवर्तनासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. या वेळी प्रा. डॉ. कदम यांनी 'श्यामची आई' हा एकपात्री प्रयोग सादर केला. प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याने घरापासून स्वच्छतेची मोहीम हाती घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांनी समाज परिवर्तनासाठी पुढाकार घेतला तर गाव, तालुका, जिल्हा बदलायला वेळ लागणार नाही, असेही ते म्हणाले. या वेळी तहसीलदार सुनीता जऱ्हाड व नगराध्यक्षा हेमलता पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नामदेव गजरे यांनी प्रास्ताविक केले.प्रा. आनंदसिंग पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राहुल तुपे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. नामदेव गजरे, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंदसिंग पाटील व प्रा. राहुल तुपे यांनी प्रयत्न केले. दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.

सकाळ

# स्वच्छतेसाठी महात्मा गांधींचा आदर्श घ्यावा

## नगराध्यक्षा हेमलता पाटील : नवापूर महाविद्यालयात युवकांशी साधला संवाद

**सकाळ वृत्तसेवा**

नवापूर,ता. २९ : महात्मा गांधींच्या स्वप्नातील 'स्वच्छ व सुंदर भारत' ही संकल्पना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक ग्रामीण भागापर्यंत घेऊन जातील, यात शंका नाही. महात्मा गांधींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून स्वच्छतेचे कार्य करा, असे प्रतिपादन नगराध्यक्षा हेमलता पाटील यांनी केले.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित साप्ताहिक व्याख्यानमालेत तिसरे पुष्प 'महात्मा गांधींच्या चळवळीत कस्तुरबांचे योगदान' या विषयावर सौ. पाटील यांनी गुंफले. उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे अध्यक्षस्थानी होते.

उपप्राचार्य प्रा. भदाणे म्हणाले, की जसे महाविद्यालय स्वच्छ ठेवण्यात स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला आहे, तसेच कार्य तुम्ही प्रत्येक गावात करावे. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ नामदेव गजरे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंदसिंग पाटील, प्रा. राहुल तुपे उपस्थित होते. प्रा. आनंदसिंग पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. एस. एस. पुलावळे यांनी आभार मानले.



**नवापूर : कला महाविद्यालयात आयोजित 'महात्मा गांधींच्या चळवळीत कस्तुरबांचे योगदान' या विषयावरील व्याख्यानात बोलताना नगराध्यक्षा हेमलता पाटील. शेजारी प्राचार्य वाय. जी. भदाणे, डॉ. नामदेव गजरे, प्रा. आनंदसिंग पाटील आदी.**

Jalgaon, Nandurbar-Today
30/09/2018 Page No. 4

लोकमत

# कोठड्यात स्वच्छता मिशन प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवापूर :** शहरातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे मौजे कोठडा येथे स्वच्छ भारत अभियान १०० तास स्वच्छता प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ.ए.जी जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली तर सरपंच विरसिंग कोकणी, उपप्राचार्य ए.बी. महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. व्यासपीठावर कार्यक्रम अधिकारी डॉ.नामदेव गजरे, मुख्याध्यापिका वळवी, उपशिक्षिका जागृती पाटील, पचायत समिती सदस्य लाजरस गावीत उपस्थित होते.

१०० तासाच्या उपक्रमात कोठडा गावात स्वच्छतेबाबत जनजागृती व प्रबोधन शिबीर, स्वच्छता मेळावा, स्वच्छता गृहांचा वापर, विदयार्थी रॅली, वृक्षारोपण, घरांना भेटी, कचऱ्याची विल्हेवाट, कचऱ्याचे व्यवस्थापन, सेंद्रीय खत निर्मिती, पथनाट्य , बायोगॅस निर्मितीसाठी मार्गदर्शन, भित्तीपत्रके, रस्ते गटार स्वच्छता, कुजणाऱ्या व न कुजणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रा.ए.बी. महाजन यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक करून त्याचा आदर्श घेऊन गावकऱ्यांनो पुढे हा उपक्रम असाच चालू ठेवावा, असे आवाहन केले. सरपंच विरसिंग कोकणी यांनी विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना एक आदर्श घालून दिला. त्यामुळे यातून आम्हाला प्रेरणा मिळाली, यापुढे निश्चितच गावातील नागरिक पुढे येतील व स्वच्छता राखण्याचा प्रयत्न करतील, असे सांगितले. जिल्हा परिषद शिक्षका जागृती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी प्राचार्य डॉ.ए.जी. जयस्वाल यांनी या अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करुन कौतुक केले.

कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.नामदेव गजरे, प्रा.गौरव बोरदे, प्रा.सुदाम कोरडे, प्रा.एकनाथ गेडाम, प्रा.विनायक वसईकर, प्रा.एस.बी. महाजन, प्रा.पंजाबसिंग वळवी, हर्षल गावीत यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा.डॉ.नामदेव गजरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.सुदाम कोरडे तर आभार प्रा.विनायक वसईकर यांनी मानले.

Hello Nandurbar
Page No. 3 Sep 23, 2018
Powered by: erelego.com

Limited Time Offer.
Upto 15% Off on Bus Booking
redBus. redbus.in
OPEN

सकाळ

# खेड्यातील लोकांना स्वयंसेवक बनवा

## जऱ्हाड : नवापूरला व्याख्यानमाला



सुनीता जऱ्हाड

**नवापूर, ता. ७ :** खेड्यापाड्यांतील लोकांना स्वयंसेवक बनविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेने पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन तहसीलदार सुनीता जऱ्हाड यांनी केले.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे स्थापनादिनाचे औचित्य साधत झालेल्या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प 'महात्मा गांधींचे सत्याचे प्रयोग' या विषयावर तहसीलदार सुनीता जऱ्हाड यांनी गुंफले. प्राचार्य. डॉ. ए. जी. जयस्वाल अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य प्रा. ए. बी. महाजन व्यासपीठावर होते.

तहसीलदार जऱ्हाड म्हणाल्या, की महात्मा गांधींचा विचार घेऊन प्रत्येक गावात शिबिर घेऊन निर्मलग्राम, रस्ते, स्वच्छता अभियान, जलसंवर्धन, शिवारफेरी, श्रमदान आणि गावकरी संवाद या माध्यमांतून ग्रामीण विकासात ऊर्जा पुरविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेने करावे. प्राचार्य डॉ. जयस्वाल म्हणाले, की शासनाच्या योजना प्रत्येक घरापर्यंत पोचविण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करू. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नामदेव गजरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंदसिंग पाटील, प्रा. राहुल तुपे आदींनी सहकार्य केले. प्रा. आनंदसिंग पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राहुल तुपे यांनी आभार मानले.

Jalgaon, Nandurbar-Today
08/10/2018 Page No. 4

# नवापुर महाविद्यालयात वनविभागामार्फत वृक्षलागवड

## मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

। नवापूर प्रतिनिधी।

शहरातील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे वनविभागा मार्फत १३ कोटी वृक्षलागवड २०१८ या अंतर्गत कार्याक्रमाचा शुभारंभ माजी मंत्री तथा आ. सुरुपसिंग नाईक व जि.प अध्यक्ष रजनी नाईक यांचा हस्ते कॉलेजचा परिसरात वृक्षारोपन करुन करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी नंदकुमार वाळेकर, वनक्षेत्रपाल प्रथमेश हाडपे, गटशिक्षण अधिकारी आर. बी. चौरे, प्राचार्य डॉ. ए जी जयस्वाल,डॉ नचिकेत नाईक, रोशन नाईक,आसिफ मलीक, केद्र प्रमुख केशव सांगळे, व वनकर्मचारी उपस्थित होते.



### घरचे कर्तव्य समजून सहभागी व्हा..

तालुक्यातील प्रत्येक यंत्रणेने वनविभागाचा रोप वाटीकेतुन रोपे घेऊन शासकीय जागेवर व रस्ता दुतर्फ जागेवर वृक्षलागवड करावी, असे आवाहन आ.सुरुपसिंग नाईक यांनी केले. तसेच वनक्षेत्रपाल प्रथमेश हाडपे यांनी नवापूर वनक्षेत्रात मौजे प्रतापपुर,भवरे,खेकडा,बिलमांजरे,उकाळापाणी,बारी,येथे आज पासुन ३लाख ५० हजार वृक्षलागवड चे काम आज पासुन युध्दपातळीवर काम सुरु झाले असल्याचे सांगितले. हे काम १३ कोटी

दैनिक दिव्य मराठी
01-Sep-2018
धुळे सिटी Page 3

**आरोग्य** योगगुरू प्रतीक पारेख यांचा सल्ला; नवापूरमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात कार्यशाळा

# तणावमुक्त जीवनासह एकाग्रतेसाठी योगा करा

प्रतिनिधी | नवापूर

योगासन केल्यामुळे कार्यक्षमता वाढते. त्याचबरोबर अभ्यासावर लक्ष केंद्रित होते. तणावमुक्त जीवन जगण्यासह एकाग्रता वाढविण्यासाठी योगासन व ध्यानधारणा करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जालना येथील प्रतीक पारेख यांनी केले.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे योग व ध्यानधारणा या विषयावर कार्यशाळा झाली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे, अनिल शर्मा, मंजुळा अग्रवाल, श्रुती अग्रवाल, अंकित अग्रवाल, कार्यक्रम अधिकारी डॉ. नामदेव गजरे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. मंदा गावित आदी उपस्थित होते. प्रतीक शर्मा म्हणाले की, तरुणांनी रोज योगासने केली पाहिजे. योगासने केल्यामुळे तणाव कमी होतो. स्मरणशक्तीत वाढ करण्यासाठी ध्यान करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नामदेव गजरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आनंदसिंग पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य प्रा. ए. बी. महाजन व प्रा. गौरव बोरदे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नामदेव गजरे, प्रा. आनंदसिंग पाटील, प्रा. गौरव बोरदे, प्रा. सुदाम कोरडे, हिरालाल वसावे, प्रकाश पिंपळे, राजू जाधव, इंद्रजीत गावित, रमेश चव्हाण, विजय कुलकर्णी यांनी प्रयत्न केले.


नवापूर येथे झालेल्या कार्यशाळेला उपस्थित विद्यार्थी.

**योगासनांची प्रात्यक्षिके**

या वेळी प्रतीक पारेख यांनी योगासनाची विविध प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून घेतली. अनिल शर्मा यांनीही योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. प्रत्येकाने रोज सकाळी किमान अर्धा तास योगसाधनेसाठी द्यावा, तसे केल्याने शरीर सुदृढ राहण्यास मदत होईल, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

# ओझोन वायूचे संरक्षण करणे काळाची गरज

**ओझोन दिनी डॉ नामदेव गजरे यांचे प्रतिपादन**



। नवापूर ✍ प्रतिनिधी।

**ओझोन** वायूचे वातावरणातील स्थान स्थितांबरामध्ये असून हा वायू २५ ते ४० किलोमीटर उंचीच्या दरम्यान असणारा हा वायू सजीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा असून या वायुचे संरक्षण काळाची गरज असल्याचे मत डॉ नामदेव गजरे यांनी सांगितले. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील उमवि व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही रासेयो एककातर्फे ' निसर्गाच्या सानिध्यात वृक्षलागवडीने ओझोनदिन झाला.

## ..तर जीवसृष्टी काही सेकंदात जळाली असती

» अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे, प्रमुख पाहुणे म्हणूनप्रा आनंदसिंग पाटील होते. सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांचे शोषण ओझोन थरात केले जाते. कदाचित वातावरणात हा थर नसता तर ही प्रखर उष्णतेची किरणे सरळ पृथ्वीवर आली असती आणि त्या किरणांमुळे सजीव सृष्टी काही सेकंदाच्या आत जळून खाक झाली असती, म्हणून ओझोन थराला 'पृथ्वीची संरक्षक छत्री' असे म्हणतात. परंतु दिवसेंदिवस कारखान्यामुळे व घरात वापरल्या जाणाऱ्या फ्रीजमुळे खूप मोठ्या ओझोन थराला छिद्र पडत असल्याचे डॉ. गजरे यांनी सांगितले. यासाठी प्रत्येकाने आपली सुंदर पृथ्वी वाचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी कमीत कमी वाहनाचा वापर, औद्योगिक क्षेत्रात वृक्षलागवड करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यासाठी आपण प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात जनजागृती करावे असे आवाहन त्यांनी केले.प्रा आनंदसिंग पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रा पंजाबसिंग वळवी, हर्षल गावीत, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा आनंदसिंग पाटील, प्रा पंजाबसिंग वळवी, हर्षल गावीत यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा पंजाबसिंग वळवी यांनी केले तर आभार हर्षल गावीत यांनी मानले.

# 'स्वच्छतेसाठी शंभर तास प्रशिक्षण'चा समारोप

## नवापूर महाविद्यालय : कोठडा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

नवापूर, ता. ११ : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'स्वच्छ भारत अभियान शंभर तास उन्हाळी प्रशिक्षण स्वच्छतेसाठी' या उपक्रमाचा समारोप कोठडा (ता. नवापूर) येथे नुकताच झाला.

प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल अध्यक्षस्थानी होते. सरपंच वीरसिंग कोकणी, उपप्राचार्य ए. बी. महाजन उपस्थित होते. योजनेमार्फत कोठडा येथे स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी प्रबोधन शिबिर, स्वच्छता मेळा, स्वच्छता गृहांचा वापर, विद्यार्थी रॅली, वृक्षारोपण, प्रत्येक घरांना भेटी, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य मार्गदर्शन, कचऱ्याचे व्यवस्थापन, सेंद्रिय खतनिर्मिती, पथनाट्य, बायोगॅसनिर्मितीसाठी मार्गदर्शन, भित्तिपत्रके, रस्ते- गटार स्वच्छता याबद्दल मार्गदर्शन केले. कुजणाऱ्या व न कुजणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन आदी विषयांवर प्रशिक्षण झाले.

प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून गावातील ग्रामस्थांना मदतीला घेऊन जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. ए. बी. महाजन यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. याचा आदर्श घेऊन ग्रामस्थांनी पुढे हा उपक्रम असाच चालू ठेवावा, असे आवाहन केले. सरपंच विरसिंग कोकणी यांनी विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना एक आदर्श घालून दिला. त्यामुळे यातून आम्हाला प्रेरणा मिळाली. यापुढे निश्चितच गावातील नागरिक पुढे येतील यात शंका नाही. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका जागृती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य जयस्वाल यांनी या अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करून कौतुक केले. ते म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावागावात होणारी स्वच्छतेची कामे परिसराला आदर्श निर्माण करणारी ठरतील. त्या- त्या भागातील ग्रामस्थ त्याचा आदर्श घेऊन आपला परिसर स्वच्छ ठेवतील. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नोडल अधिकारी डॉ. नामदेव गजरे, प्रा. गौरव बोरदे, प्रा. सुदाम कोरडे, प्रा. एकनाथ गेडाम, प्रा. विनायक वसईकर, प्रा. एस. बी. महाजन, प्रा. पंजाबसिंग वळवी, हर्षल गावित, मीना शहा, कुशलता मावची यांनी परिश्रम घेतले. प्रा. सुदाम कोरडे यांनी सूत्रसंचालन केले. विनायक वसईकर यांनी आभार मानले.


**नवापूर : राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वच्छ भारत अभियानांतर्गत शंभर तास उन्हाळी प्रशिक्षण स्वच्छता उपक्रमाच्या समारोपप्रसंगी बोलताना श्री. गजरे. शेजारी प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल, वीरसिंग कोकणी, ए. बी. महाजन.**

# महात्मा गांधी यांच्या शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी जयंतीदिनी जीवनग्रंथ प्रदर्शन

**महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम**

। नवापूर ✍ प्रतिनिधी।

**राष्ट्रपिता** महात्मा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती उत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक कार्यक्रमात कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित साप्ताहिक व्याख्यानमालेत चौथे पुष्प ' गांधी विचार व आजचा युवक आणि महात्मा गांधीच्या जीवन ग्रंथाच्या पुस्तक प्रदर्शनाचे उदघाटन करून ' प्राचार्य डॉ ए जी जयस्वाल यांनी गुंफले.

## उमवि-यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे सहकार्य

» **राष्ट्रीय** सेवा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या दोन्ही राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे ' राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय यांच्या सयुंक्त विद्यमाने आयोजित महात्मा गांधी यांच्या जीवन ग्रंथाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हे दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार असून, महात्मा गांधीजींचे संघर्ष आणि विचार जाणून घेण्यासाठी या ग्रंथ प्रदर्शनाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए जी जयस्वाल यांनी केले, पुढे बोलताना ते असे म्हणाले की गांधींचे विचार आजच्या युवकांमध्ये रुजविणे अतिशय गरजेचे आहे यासाठी महात्मा गांधींच्या ग्रंथ वाचणे काळाची गरज आहे .या ग्रंथ प्रदर्शनाच्या उदघाटनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए जी जयस्वाल , उपप्राचार्य प्रा वाय जी भदाणे , कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे, ग्रंथपाल प्रा राहुल तुपे , प्रा डॉ आय जी पठाण , प्रा पंजाबसिंग वळवी होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे , व ग्रंथपाल प्रा राहुल तुपे , यांनी परिश्रम घेतले . सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक , पत्रकार, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी भेट दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ नामदेव गजरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा राहुल तुपे यांनी केले.

